
Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA




Volume - IX, Issue - I,
January - March - 2020
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

CamScanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

- IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - I

## Peer Reviewed Referred
## and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | भूकेचा जागतिक व भारतीय संदर्भातील निर्देशांक<br>प्रा. डॉ. हशीम गुलाब वलांडकर | ५४-५७ |
| १४ | राजकीय नेतृत्वाच्या जडणघडणीमध्ये नैतिक मूल्यांचे योगदान<br>सा. प्रा. कु. धनश्री तानाजी पाटील | ५८-६१ |
| १५ | संस्कृत सुभाषितांतून प्रतिबिंबित मानवीमूल्ये<br>प्रा. डॉ. श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे | ६२-६८ |
| १६ | मराठी जैन कथेतील अहिंसा मूल्य<br>जगदीश आवटे | ६९-७३ |
| १७ | मूल्य रूजविण्यात शिक्षकाची भूमिका<br>प्रा. सौ. लक्ष्मी विष्णू भंडारे | ७४-७९ |
| १८ | मानवीमूल्ये आणि जागतिकीकरण : अनुबंध<br>प्रा. मधुकर रामचंद्र काळबागे<br>प्रा. सुखदेव विष्णू कोल्हे | ८०-८३ |
| १९ | स्वातंत्र्यसैनिक - महादेव माळकर यांचे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील कार्य<br>डॉ. संगीता एस. पाटील | ८४-८७ |
| २० | जागतिकीकरणाचे भारतातील आर्थिक व सामाजिक मूल्यांवर झालेले परिणाम<br>सौ. एन. एस. पाटील | ८८-९१ |
| २१ | मानवाधिकार आणि महिला सक्षमीकरण<br>डॉ. एस. एन. कांबळे | ९२-९५ |
| २२ | प. पू. बापूजी. साळुंखे यांची प्रार्थना आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सांस्कृतिक केंद्रातून मूल्यांच्या सवंर्धनाचा प्रसार आणि प्रचार<br>डॉ. पाटील बाबुराव मल्हारी | ९६-९८ |
| २३ | दया पवार यांच्या 'कोंडवाडा' कवितेतील मूल्यभाव<br>डॉ. प्रकाश आप्पासाहेब हुलेनवर | ९९-१०० |
| २४ | जागतिकीकरणाच्या काळात मानवी मूल्ये जोपासण्याची समस्या, एक आव्हान: आणि काळाची गरज<br>प्रा. स्वानकर राहुल मा. | १०१-१०५ |


CamScanner

# १८. मानवीमूल्ये आणि जागतिकीकरण : अनुबंध

**प्रा. मधुकर रामचंद्र काळबागे**
जीवनप्रबोधिनी कन्या महा. विटा.
**प्रा. सुखदेव विष्णू कोल्हे**
शरचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद.

## प्रस्तावना

जगणे ही माणसाच्या प्रत्येक कार्यामागील मुख्य आणि प्रबळ प्रेरणा. आज हे जगणे प्रचंड धावपळीच्या मार्गाने प्रवास करत आहे. या धावपळीच्या काळात शिक्षणाचे महत्त्व वाढत आहे. मात्र हे शिक्षण केवळ गुणात्मक पातळीवर मर्यादित झाले आहे. या शिक्षणामध्ये संस्कारक्षम मूल्यांची मात्र उणीव स्पष्टपणे जाणवते. औपचारिक शिक्षण घेणाऱ्या प्रत्येकाची ज्ञानप्राप्ती ही त्याला मिळणाऱ्या गुणांवर ठरविली जाते. स्वाभाविकतः या शिक्षणामध्ये संस्कार, सदगुण, सदाचार, सदप्रवृत्ती यांच्या विकासाला कुठेच स्थान जाणवत नाही. परिणामी मानवी मुल्यांची घसरण होताना दिसत आहे. या सर्व गोष्टींचा परिणाम अपरिहार्यपणे समाजातील निकोप आणि सहिष्ण वातावरणावर होत आहे. नात्यांचे अवमूल्यन होत आहे. प्रतिष्ठेच्या संकल्पना बदलत आहेत. खाऊजा संस्कृती म्हणजेच आयुष्य मानणारा एक गट निर्माण होत आहे. नात्यांना वृध्दाश्रमांच्या बाजारात सोडून माणूस चंगळवादी प्रवृतीचा भोक्ता बनला आहे. त्यातूनच जागतिकीकरणाच्या दाट छायेत स्वतःला सुरक्षित मानणारा माणूस वर्तमानातील वास्तवापासून कोसो दूर असल्याचे दिसत आहे. तरीही मानवी मूल्यांचा विचार म्हणजे भारतीय संस्कृतीचा विचार आहे. आणि संस्कृतीचा विचार इतका व्यापक आहे की, एका शोधनिबंधाच्या सीमारेषेत बसविणे कठीण आहे.

## मूल्य : संकल्पना व स्वरुप

१. मानवी जीवनाशी संबंधित समाजाचे त्याचप्रमाणे त्या त्या समाजातील व्यक्तींचे काही ध्येये, उदिष्टे, आदर्श अथवा नियम असतात. त्यांना त्या समाजाची वा व्यक्तीची मूल्ये असे म्हणतात. या मूल्यांची निकोप वाढ होण्यासाठी माणूस स्वंयसिध्द असायला हवा.
२. ज्याची आकांक्षा धरावी व पाठपूरावा करावा अशा गोष्टी म्हणजे मूल्य होय.
३. मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वामधील ज्या ज्या गोष्टींना समाजमूल्य आहे ती गोष्ट म्हणजे मूल्य होय.
४. माणसाचे वर्तन कसे असावे यासंबंधी समाजाने जसे आदर्श निर्माण केलेले असतात. ते आदर्श म्हणजे मूल्य होय.

मूल्यांच्या वरील व्याख्येवरुन मूल्य म्हणजे ज्याधारे मनोधारणेची विशिष्ट अवस्था किंवा घडण दर्शविली जाते तो शब्द होय. स्वंयसिध्द आणि योग्य अशा ध्येयांची आणि आदर्शांची गणना मूल्यामध्ये केली जाते. मनुष्याचे वर्तन हे आदर्शवत असावे. समाजहित डोळयासमोर ठेवून स्वतःला काही बंधणे घालून घेणे ही बंधणे म्हणजेच मुल्य होय. आणि मानवी अस्तित्वामध्ये मूल्य हे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मानवी मूल्यांची निकोप वाढ व्हायला हवी, त्यासाठी माणूस स्वंयसिध्द असायला हवा.

मूल्ये ही अमूर्त असतात. त्यामुळे ती केवळ परिणाम रुपाने दिसून येतात. काही प्रमाणात मूल्ये ही मानवी भावनेचाच एक भाग असतो. मूल्ये कुठेही विकत घेता येत नाहीत तर ती शिकवावी लागतात. विषय, उद्दिष्टे, दृष्टीकोन, कार्यक्षेत्र अशा विविध प्रकारे या मूल्यांची विभागणी होऊ शकते. त्यामुळे मानवी मूल्यांचे स्वरुप हे खुपच व्यापक आहे. सत्य, अहिंसा, शांती, चारित्र्य, त्याग, कर्तव्य, अधिकार, आध्यात्मिकता, प्रामाणिकपणा, जेवण, घर, कपडे, प्रकृती, प्रवृत्ती, कला, प्रेम, दया, सेवा, जबाबदारी, निपक्षता, ही मूल्ये माणसाच्या रोजच्या आयुष्यात वापरावी लागतात. म्हणूनच या मानवी मूल्यांचे जीवनातील मूल्य समजून घेणे आवश्यक ठरते.

**मानवी मूल्ये आणि समाज**

भारतीय चलनातील नाणे हे दोन बाजूचे आहे. दोन्ही बाजू असल्याशिवाय ज्याप्रमाणे नाणे बाजारात चालत नाही. त्याप्रमाणे माणसाचे आयुष्य हे समाज आणि मानवी मूल्ये याशिवाय निव्वळ अपूर्ण आहे. मानवी मूल्ये ही मानवी भावनांचाच एक भाग आहे. भावना म्हणजे माणसांची अनेक आंतरक्रियापैकी एक आहे. तर समाजशास्त्रज्ञ **डेव्हिड डेसलर** यांच्या मते मानवी आंतरक्रियांचा शास्त्रीय अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय. त्याचप्रमाणे **पीट रोस** यांनाही समाजशास्त्राची व्याख्या करताना समाज आणि मानवी आंतरक्रियांच्या प्रतिमानांचा व्यवस्थित अभ्यास अभिप्रेत आहे.

आपल्या देशात समाजविरहित मनुष्य अस्तित्वात नाही. अनेक वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रकार्यांमध्ये समूह म्हणजेच समाज ही मध्यवर्ती बाब मानली जाते. त्यामुळे मानवी मूल्यांचा आणि समाजाचा संबंध हा सयामी जुळयाप्रमाणे मानावा लागतो. वैयक्तिक आयुष्य जगताना व्यक्तिचे सामाजिकरण होत असते. परिणामी समाजाची संस्कृती, नियमने, वर्तनप्रणाली, रुढी, नीती, परंपरा इत्यादीचे आंतरिकरण होत असते. त्यामुळे आपोआपच वैयक्तिक जगण्याचा व त्यातील बऱ्या वाईट अशा अनेक गोष्टींचा परिणाम हा स्वाभाविकपणे समाजावरती होत असतो. म्हणूनच समाजातील रुढ नियमानुसार समाज समूह सदस्यांनी वर्तन करणे आवश्यक असते. आज महासत्ताक होऊ पाहत असलेल्या भारत देशामध्ये मानवीमूल्यांचे राजरोस अवमूल्यन होताना दिसत आहे. राजकारण, शिक्षण, समाज अशा सर्वच पातळयावर मानवीमूल्ये पायदळी तुडविली जात आहेत. या मूल्यांचे संवर्धन होईल अशी समाजप्रणाली निर्माण होणं ही काळाची गरज आहे.

**जागतिकीकरण**

१९८० नंतर भारत देशात खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाची प्रकिया सुरु झाली. आर्थिक नियोजन सोडून आर्थिक धोरणाचा अवलंब केला. खेडयांचे शहरीकरण होवून शहरे अंतर्बाहय बदलली. दुरदर्शन, संगणक, मोबाईल यासारख्या यांत्रिक व भौतिक सुविधांमुळे जग माणसाच्या जीवनाशी अविभाज्यपणे जोडले गेले. या माध्यमक्रांतीने मानवी जीवन अक्षरशः चमकून गेले. हेच जणू भांडवलशाही येण्याचे सुतोवाच होते. याचे परिणाम साहित्यापासून ते संविधानापर्यंत आणि म्हाताऱ्या माणसांपासून ते नवजात बालकापर्यंत सर्वच ठिकाणी जाणवू लागले. ग्रामीण भागातील ग्राम्यता संपुष्टात येवून शहरातील मध्यमवर्गीय माणूस समाजापासून फारकत घेवू पाहत आहे. वेगवेगळ्या स्तरातील विरोधाची दरी रुंदावत आहे. महानगरे तिथली दहशत, दंगली, दांभिकता यांचे विद्रुप रुप सामान्य माणसांची असुरक्षितता क्रुरता, गुंडगिरी, धर्मांधता हिंसाचार यांचे प्राबल्य वाढत गेले या सर्व गोष्टीचा परिणाम साहित्य, समाज, उदयोग, शिक्षण, माणूस व स्वाभाविकपणे मानवी मूल्यांवरही स्पष्टपणे जाणवू लागला आहे. माणूस हा माणूस न राहता तो निव्वळ एक ग्राहक बनला आहे

एका बाजूला या मुक्त अर्थव्यवस्थेत जगणारा शहरी मध्यमवर्गीय तर दूसऱ्या बाजूला भूक, दारिद्रय, अज्ञान इ. गोष्टी वाढण्याचा वेग प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मानवी मूल्यांवर परिणाम करत आहेत. आर्थिक उदारीकरणाच्या नावाखाली अर्थसत्ता असलेल्या मूठभर लोकांच्या जागतिकीकरणाने सामान्य माणसांचे जगणे सुध्दा हीन दर्जाचे करुन टाकले आहे. जागतिकीकरणामुळे माणूस दारिद्रय, उपासमार, शोषण बेकारी यांचा बळी ठरला आहे. अशा अनेक गोष्टी जागतिकीकरणाच्या परिणामांचा महत्त्वाचा टप्पा आहे.

**जागतिकीकरणाचा मानवी मुल्यावरील परिणाम**

ज्ञानार्जन हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. आज प्रत्येक विद्यार्थी आणि जीवनाच्या सामाजिक पटलावर अनुभवांची शाळा शिकणारा प्रत्येकजण २१ व्या शतकाच्या उंबरठयावर आहे.

सत्यवंद ! धर्मच्चर
मातृदेवो भव ! पितृदेवो भव !!
आचार्य देवो भव ! अतिथी देवो भव !!

असे मानणाऱ्या संस्कृतीचा प्रभाव असणाऱ्या समाजामध्ये मानवीमूल्ये खूप महत्त्वाची आहेत. तांत्रिक उत्क्रांतीमुळे माणूस वेगडीपणाने माणसाच्या जवळ आला तसा तो वास्तवाच्या पातळीवर खूपच लांब गेला. कधीकधी माणूस आपल्या स्वकीयांची ख्याली खुशाली जाणून घेण्यासाठी चार ओळींच्या पत्राची वाट बघायचा. मात्र आज इच्छा झाली की मोबाईल माध्यमाने थेट संबधित व्यक्तीशी बोलतो. करमणूकीची साधने वाढली. जे ज्ञान मिळविण्यासाठी श्रम, पैसा, आणि वेळ खर्च व्हायचा. तेच ज्ञान आज आंतरजाल एका क्षणात आपल्यासमोर ठेवते. इतकेच नव्हे तर आज प्रत्येक क्षेत्रामध्ये यांत्रिकीकरण झाल्याने मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी फारसे कष्ट पडत नाहीत. किंबहुना अन्न, वस्त्र, निवारा या गरजांशिवाय माणसांकडे सोयी सुविधा खूप वाढल्या आहेत. आर्थिक सुबत्ता आली. एकूणच जागतिकीकरणामूळे मानवाची नेत्रदिपक प्रगती झाली. हे मान्यच करावे लागते. जागतिकीकरणाचा सकारात्मक परिणाम ही जागतिकीकरणाची एक बाजू आहे. त्याची दुसरी बाजूसुध्दा अधोरेखित होणे आवश्यक आहे.

**अनिष्ट परिणाम**

जागतिकीकरणाचा वाढता प्रभाव आणि त्याचा परिणाम म्हणजे गेल्या काही वर्षात मानवी जीवनशैलीमध्ये अत्यंत वेगाने बदल होत आहे. महानगरामध्ये होणारा हा बदल शहरातून पसरत आता खेडयापर्यंत आला आहे. उत्पादनापेक्षाही उपभोगाची प्रवृत्ती वाढविणारी प्रक्रिया निर्माण झाली आहे. जुन्याच आणि पारंपरिक बाबी नव्या रुपात लोकांपुढं आणून त्यांची इच्छा जागृत करण्याचे काम अनेक उत्पादक करत आहेत. कमी श्रमात अधिक पैसा मिळवून अधिकाधिक ऐशोराम मिळविण्यासाठी वाटेल तो मधला मार्ग स्वीकारणारी पिढी निर्माण होत आहे. शरीर कमावणेसाठी व्यायाम करणे ही अत्यंत साधी बाब पिढयान्पिढया संक्रमित होत आली आहे. मात्र तोच व्यायाम जर जिममध्ये केला तर कमवलेले शरीर हे चिरतरुण असेल असे भासविणाऱ्या या जाहिरात संस्कृतीने तरुण पिढीला कष्टापेक्षा अधिक चंगळवादी प्रवृतीकडे ओढले आहे. हे आज पदोपदी जाणवतेय,

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये विषमता, शोषण, स्वार्थनिर्मिती रंजनपरता, स्पर्धा, हेवेदावे यामुळे माणसाच्या माणूसपणाला, त्याच्या भावनांना व पर्यायाने मानवी मूल्यांना काहीच किंमत उरली नाही. इलेक्टॉनिक वस्तूचा वाढता वापर, खाऊजा संस्कृती माणसामाणसातील विसंवाद, नातेसंबधातील भावनिक दुरावा या सर्व बदलांच्या मुळाशी निव्वळ मानवी मूल्यांचे अवमूल्यन आहे.

**परिणाम**

चांगल्या रुढी आणि परंपरा संपुष्टात येऊन वेगळी अवस्था निर्माण होत आहे. जागतिकीकरणामुळे प्रतिष्ठेच्या संकल्पना बदलल्या. प्रतिष्ठेमध्ये असणाऱ्या मानवी मूल्यांची जागा पैसा वस्तू, गाडी, बंगला, यांनी घेतली. एकत्र कुटुंबपध्दती नामशेष होऊन विभक्त कुटूंबपध्दती आली. मातृ पितृ देवो भव ! म्हणणारी संस्कृती आणि पिढी आज वृध्दश्रमांची संस्था वाढवत आहे. हा सगळा परिणाम प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे जागतिकीकरणाचाच आहे. कारण आर्थिक सुबत्ता, चैनविलास, चंगळवाद, खाऊजा संस्कृतीने परंपारिक व्यवसाय, कला, दया आणि अपरिहार्यपणे सर्व मानवी मूल्यानांच गिळंकृत केले आहे.

**समारोप**

जागतिकीकरणाच्या युगात भारतीय समाजाचे, समाजमनाचे अध्ययन मानवी मुल्यासंदर्भात करणे एक मोठे आव्हान आहे. परंतू देशाचे भविष्य हे शाळांमध्ये आकारास येते. आजच्या विद्यार्थ्यांमध्येच उदयाचा सुसंस्कारीत नागरिक घडविला जात असतो. त्यामुळे मानवीमूल्ये, नातेसंबंध माणूस म्हणून माणसाचे असलेले मूल्य, प्रामाणिकपणा, श्रमप्रतिष्ठा, सर्वधर्मसमभाव, सहनशिलता, क्षमाशिलता या मानवीमूल्यांची रुजवण शिक्षणातून होणे ही काळाची गरज आहे. उपभोगाची वळावत असणारी प्रवृती विनाशाकडे घेऊन जाणारी आहे हे सत्य विद्यार्थी दशेतच रुजायला हवे. मात्र आज बदलल्या व्यवस्थेने मानवीमूल्यांची जागा घेतलेली आहे. अनिष्ठ अथवा वाईट केली जाणारी गोष्ट ही फॅशन आणि सुधारलेपणाच्या नावावर टाकून मानवी मूल्यांची पायमल्ली राजरोसपणे केली जात आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. जागतिकीकरण व भारत : पंडित, नलिनी, लोकवांड्.मयगृह, मुंबई
२. नंतर आलेले लोक : काळे अरुण, लोकवांड्.मयगृह, मुंबई
३. तळ ढवळताना : कानडे लहू, लोकवांड्.मयगृह, मुंबई
४. समाजशास्त्र परिचय : माने माणिक, विद्या प्रकाशन, नागपूर
५. आदिवासींचे समाजशास्त्र : माने माणिक, गढवाल ए. ए. विद्या प्रकाशन, नागपूर
६. साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण : नेमाडे भालचंद, लोकवांड्.मयगृह, मुंबई जागतिकीकरण व मराठी साहित्य
७. डॉ. सौ. नलिनी महाडिक गौरव ग्रंथ : गायकवाड शरद, शिंदे सुनिल, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी
८. समाज परिवर्तन व आव्हाने : शिवाजी विद्यापीठ कार्यशाळा, संपा. ठाकूर गणेश
९. भारतीय समाजातील नैतिकमूल्ये : संपा. खैरनार दिलीप, डायमंड पब्लिकेशन्स